वर्ष- १२ | अंक- १८ | मुंबई, मंगळवार,१७ मार्च २०२६ ते २३ मार्च २०२६ | पृष्ठ-४

ठाणे आवृत्ती

मराठी साप्ताहिक

R.N.I. No. MAHMAR/2014/60133

मूल्य २/- रुपये

POSTAL REGISTRATION No. PLG/205/2025- 2027

पोलीस बातमी पत्र

POLICE BATMI PATRA

संपादक : दिपक मोरेश्वर नाईक

PG|2

घसादुखीवर 'हे' झटपट घरगुती उपाय नक्की येतील कामी

3 → स्वच्छ, शाश्वत ऊर्जास्रोत

घरात घुसून 14 वर्षांच्या मुलीवर बलात्कार, घाबरून गप्प बसली ← 4

www.policebatmipatra.in | policebatmi | police batmi patra | policebatmipatra | policebatmipatra@gmail.com

दिवसा घरफोडी करणारा सराईत चोर अटकेत; ४८ गुन्ह्यांची उकल, १.३९ कोटींचे सोन्याचे दागिने जप्त



ही कारवाई पोलीस आयुक्त आशुतोष डुंबरे, अप्पर पोलीस आयुक्त (गुन्हे) डॉ. पंजाबराव उगले, पोलीस उपआयुक्त (गुन्हे) अमरसिंह जाधव, सहाय्यक पोलीस आयुक्त (शोध-१) शेखर बागडे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सचिन गायकवाड, पोलीस उपनिरीक्षक दीपक घुगे, दीपक जाधव, सहायक पोलीस उपनिरीक्षक सुनील माने तसेच पथकातील इतर कर्मचाऱ्यांनी पार पाडली.

ठाणे। दिवसा बंद घरांवर लक्ष ठेवून घरफोडी करणाऱ्या सराईत चोराला ठाणे गुन्हे शाखा घटक-१ च्या पथकाने अटक केली असून त्याच्याकडून ४८ घरफोडीचे गुन्हे उघडकीस आले आहेत. आरोपीकडून सुमारे १ कोटी ३९ लाख रुपये किमतीचे १.०३ किलो वजनाचे सोन्याचे दागिने जप्त करण्यात आले आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, मागील दोन-तीन वर्षांपासून दिवा पूर्व आणि मुंब्रा परिसरात बंद घरांचे बाथरूम व खिडक्यांच्या लोखंडी ग्रिल उचकटून तसेच मुख्य दरवाज्याचे कडी-कोयंडे तोडून घरफोडी होत असल्याच्या अनेक तक्रारी मुंब्रा पोलीस ठाण्यात दाखल झाल्या होत्या. या मालिकेतील घरफोड्यांचा तपास गुन्हे शाखा घटक-१ कडून सुरू होता.

तांत्रिक विश्लेषण आणि घटनास्थळाजवळील सीसीटीव्ही फुटेजचे विश्लेषण करून पोलिसांनी संशयिताची ओळख पटवली. आरोपी ओळख लपवण्यासाठी प्रवास करताना विविध मार्गांचा वापर करत असल्याचेही तपासात समोर आले. तांत्रिक विश्लेषण आणि गुप्त बातमीदारांच्या मदतीने पोलिसांनी शिवाजी गोपाळ संते (वय ३१) याला २ मार्च २०२६ रोजी टिटवाळा पूर्व येथून अटक केली.

चौकशीदरम्यान आरोपीने मुंब्रा पोलीस ठाण्याच्या हद्दीत मागील काही वर्षांत ४८ घरफोडीचे गुन्हे केल्याची कबुली दिली. पोलिसांनी त्याच्याकडून चोरीस गेलेले १.०३ किलो वजनाचे सोन्याचे दागिने जप्त केले आहेत.

तपासात आरोपी बंद घरांवर लक्ष ठेवून बाथरूम किंवा खिडक्यांच्या लोखंडी ग्रिल तसेच मुख्य दरवाज्याचे कडी-कोयंडे लोखंडी रॉडच्या साहाय्याने उचकटून घरफोडी करत असल्याचे उघड झाले आहे.

कल्याण रेल्वे स्थानक परिसरात महिला पोलिसांची विशेष मोहीम; वाहतूक व अतिक्रमणाविरोधात 103 कारवाया



कल्याण। कल्याण रेल्वे स्थानक व परिसरात महिला पोलिसांकडून विशेष संयुक्त मोहीम राबवून वाहतूक नियमभंग आणि अतिक्रमणाविरोधात कारवाई करण्यात आली. या कारवाईत एकूण १०३ प्रकरणांवर कारवाई करण्यात आली असल्याची माहिती पोलिसांनी दिली. ही मोहीम महात्मा फुले चौक पोलीस ठाणे हद्दीत राबविण्यात आली. अतुल झेंडे, पोलीस उपायुक्त (झोन-३, कल्याण पश्चिम) यांच्या आदेशानुसार तसेच घेटे, सहाय्यक पोलीस आयुक्त (कल्याण) यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली. विशेष म्हणजे या संपूर्ण मोहिमेत केवळ महिला अधिकारी व महिला पोलीस अंमलदार सहभागी झाले होते. कारवाईदरम्यान वाहन तपासणीसाठी नाकाबंदी करण्यात आली असून नियमभंग करणाऱ्या वाहनधारकांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली. तसेच रेल्वे स्थानक परिसरात पायी गस्त घालून स्कायवॉकवरही तपासणी करण्यात आली. यावेळी कल्याण डोंबिवली महानगरपालिका (केडीएमसी) अतिक्रमण विभागाच्या मदतीने स्टेशन परिसरातील अतिक्रमणेही हटविण्यात आली. या मोहिमेत विविध कलमान्वये कारवाई करण्यात आली असून त्यामध्ये कोपता अंतर्गत ३५, कलम ११२ व ११७ अंतर्गत १७, कलम १०२ व ११७ अंतर्गत २८ तसेच वाहतूक शाखेच्या मदतीने नाकाबंदी दरम्यान २३ अशा एकूण १०३ कारवाया करण्यात आल्या. या विशेष मोहिमेत ४ महिला अधिकारी व ३२ महिला पोलीस अंमलदार सहभागी झाले होते. रेल्वे स्थानक परिसरात कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी तसेच वाहतूक शिस्त प्रस्थापित करण्यासाठी अशा प्रकारच्या मोहिमा पुढेही राबविण्यात येणार असल्याचे पोलिसांनी सांगितले.

अंबिवली तलाठी कार्यालयातील खाजगी इसम लाच घेताना रंगेहात पकडला; एसीबीची कारवाई



कल्याण। जमिनीच्या फेरफार नोंदींच्या प्रमाणित प्रती देण्यासाठी 'चहापाणी'च्या नावाखाली लाच मागणाऱ्या अंबिवली येथील तलाठी कार्यालयातील एका खाजगी इसमाला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) ५ हजार रुपयांची लाच स्वीकारताना रंगेहात पकडले. ही कारवाई मंगळवारी सकाळी सापळा रचून करण्यात आली. या प्रकरणात निलेश हनुमान पवार (वय ३५, रा. माल्हेड, ता. मुरबाड) असे ताब्यात घेतलेल्या खाजगी इसमाचे नाव आहे. तो अंबिवली (ता. कल्याण) येथील तलाठी कार्यालयात काम करत होता. तक्रारदार हे व्यवसायाने वकील असून त्यांच्या अशिलांच्या वतीने मोहने गावातील सर्व्हे क्रमांक ४५ हिस्सा ४/१ आणि सर्व्हे क्रमांक ४६/७ या जमिनीच्या वादासंदर्भात तहसीलदार कार्यालय, कल्याण येथे दावा दाखल करायचा होता. त्यासाठी संबंधित जमिनीच्या फेरफार नोंदी (१९७६ व २३०५) आणि संबंधित कागदपत्रांच्या प्रमाणित प्रती मिळण्यासाठी त्यांनी २३ डिसेंबर २०२५ रोजी अर्ज केला होता. दरम्यान, अर्जाची चौकशी करण्यासाठी जानेवारी २०२६ मध्ये ते तहसील कार्यालयात गेले असता सदर अर्ज अंबिवली येथील तलाठी कार्यालयात पाठविण्यात आल्याची माहिती देण्यात आली. त्यानंतर तक्रारदार तलाठी कार्यालयात गेले असता निलेश पवार यांनी नोंदी जुना असल्याचे कारण सांगत कागदपत्रे देण्यास टाळाटाळ केली. १७ फेब्रुवारी २०२६ रोजी झालेल्या भेटीत पवार यांनी कागदपत्रांची संचिका शोधून तहसीलदार कार्यालयात पाठविण्यासाठी 'चहापाण्या'च्या नावाखाली ४ ते ५ हजार रुपयांची मागणी केल्याचे तक्रारीत नमूद आहे. याबाबत तक्रारदारांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार केली होती. एसीबीने १० मार्च रोजी पडताळणी केली असता पवार यांनी ५ हजार रुपयांची लाच मागून स्वीकारण्याचे मान्य केल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर सापळा रचून तलाठी कार्यालयातच सकाळी सुमारे ११.२५ वाजता तक्रारदारांकडून ५ हजार रुपये स्वीकारताना त्यांना रंगेहात ताब्यात घेण्यात आले. या कारवाईत एसीबी ठाणे परिक्षेत्राचे पोलीस अधीक्षक शिवराज पाटील, अपर पोलीस अधीक्षक भागवत सोनावणे व सुहास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने ही कारवाई केली. आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. दरम्यान, भ्रष्टाचारासंदर्भात माहिती असल्यास किंवा कोणी लाच मागितल्यास नागरिकांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाशी संपर्क साधावा, असे आवाहन एसीबीने केले आहे.

जालन्यात देहविक्रय अड्ड्यांवर पोलिसांची छापेमारी

चार बांग्लादेशी महिला ताब्यात... राष्ट्रगीत गायला लावलं

मुंबई। बेकायदेशीर बांग्लादेशींचा मुद्दा सध्या राज्यभर चर्चेत आहे. अशातच जालन्यातून एक खळबळजनक बातमी समोर येत आहे. जालन्यातील एका देहविक्रय अड्ड्यावर पोलिसांनी छापा टाकला असता धक्कादायक माहिती समोर आली आहे. या कारवाईत ताब्यात घेतलेल्या महिलांपैकी ४ महिला बांगलादेशी नागरिक असल्याचे निष्पन्न झाले आहे. जालना शहरातील बसस्थानक परिसर गेल्या काही काळापासून अनैतिक व्यवसायांसाठी चर्चेत आहे. तिथे पोलिसांनी विशेष मोहीम राबवून मोठी छापेमारी केली. बसस्थानकापासून दीड किलोमीटरच्या परिघात असलेल्या २४ लॉजपैकी दोन लॉजवर पोलिसांनी ही धडक कारवाई केली, ज्यामध्ये ७ पुरुषांसह १३ महिलांना ताब्यात घेण्यात आले.

याआधी मुंबई अन् पुण्यात वास्तव्य

तपासात असे समोर आले आहे की, या महिला जालना येथे येण्यापूर्वी मुंबई आणि पुणे यांसारख्या शहरांमध्ये वास्तव्यास होत्या. आपली खरी ओळख लपवण्यासाठी त्यांनी बनावट आधार कार्ड आणि बनावट सिम कार्डचा वापर केला होता. मानवी तस्करीच्या माध्यमातून त्यांना जालन्यात आणले गेल्याचा संशय पोलिसांना आहे. या महिलांकडील मोबाईल फोन जप्त करण्यात आले असून, पुराव्यांच्या आधारे त्यांचे आंतरराष्ट्रीय संपर्क आणि यामागील मोठ्या रॅकेटचा शोध घेतला जात आहे.



राष्ट्रगीत गाता आले नाही

चौकशीदरम्यान यातील चार महिलांच्या बोलण्याच्या पद्धतीवरून पोलिसांना संशय आला. सुरुवातीला या महिलांनी स्वतःला भारतीय नागरिक असल्याचे सांगत वैध कागदपत्रे असल्याचे दावे केले. मात्र, त्यांनी सादर केलेले आधार कार्ड तपासले असता ते बनावट असल्याचे आढळून आले. पोलिसांचा संशय बळावल्यावर त्यांनी या महिलांना भारताचे राष्ट्रगीत म्हणायला सांगितले, परंतु त्यांना राष्ट्रगीत गाता आले नाही. अखेर कडक चौकशीनंतर या महिलांनी आपण बांगलादेशी नागरिक असून अवैध मार्गाने भारतात प्रवेश केल्याची कबुली दिली.

पोलिस प्रशासनाने काय सांगितले?

सध्या या आरोपी महिलांना न्यायालयात हजर केले असता, त्यांची रवानगी न्यायालयीन कोठडीत करण्यात आली आहे. या महिला बांगलादेशातून भारतात नेमक्या कोणत्या मार्गाने आल्या आणि त्यांना जालन्यापर्यंत पोहोचवण्यात कोणाकोणाचा हात आहे, याचा तपास पोलीस करत आहेत. बनावट कागदपत्रे तयार करणाऱ्या टोळीवर आणि अवैध घुसखोरीला मदत करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात येईल, असे पोलीस प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

मॅट्रिमोनिअल साइटवर महिलांशी ओळख, नंतर लैंगिक शोषण अन् पैसे सुद्धा उकळले!

पोलिसांनी केला पर्दाफाश



पुणे। मॅट्रिमोनिअल वेबसाइटच्या माध्यमातून महिलांशी ओळख करून त्यांची फसवणूक करणाऱ्या टोळीचा पर्दाफाश करत नवी मुंबई पोलिसांच्या क्राइम ब्रांचने दोन आरोपींना अटक केल्याचं वृत्त समोर आलं आहे. आरोपी आपली खोटी ओळख सांगून महिलांशी ओळख करायचे आणि त्यांच्याकडून पैसे उकळत असल्याचा आरोप देखील करण्यात आला आहे.

लग्नाचं आमिष दाखवून महिलांची फसवणूक

पोलिसांच्या माहितीनुसार, आरोपी पीडित महिलांना लग्नाचं आमिष दाखवून महिलांशी संपर्क साधायचे आणि त्यांचा विश्वास संपादन करायचे. त्यानंतर, एकत्र भविष्य घडवण्याचे आणि घर किंवा फ्लॅट खरेदी करण्याचं स्वप्न दाखवून, महिलांना त्यांच्या नावावर 'Pre Approved Personal Loan' कर्ज घेण्यास प्रवृत्त केलं गेलं. त्यानंतर कर्जाची रक्कम आरोपी आपल्या खात्यात ट्रान्सफर करून घ्यायचे. काही प्रकरणांमध्ये, लैंगिक शोषणाचे आरोप समोर आले आहेत.

आरोपींकडून ८९ लाख ४० हजार रुपये जप्त

या धक्कादायक प्रकरणात नवी मुंबई, पनवेल, ठाणे, मुंबई आणि पुणे येथील विविध पोलीस स्टेशनमध्ये भारतीय दंड संहिता आणि आयटी ॲक्ट अंतर्गत गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. प्राथमिक तपासातून तक्रारदार आणि इतर चार महिला साक्षीदारांची लाखो रुपयांची फसवणूक झाल्याचं समोर आलं आहे. पोलिसांनी आरोपींकडून आतापर्यंत ८९ लाख ४० हजार रुपये जप्त केले आहेत. तसेच, आरोपीने गोव्यातील एका कॅसिनोमध्ये मोठ्या प्रमाणात पैसे खर्च केल्याचंही सांगितलं जात आहे. आदर्श प्रशांत म्हात्रे (३४ वर्षे) आणि प्रेम किरण म्हात्रे (२९) अशी आरोपींची ओळख समोर आली असून आरोपींकडून आर्थिक व्यवहारांशी संबंधित कागदपत्रे आणि डिजिटल पुरावे जप्त करण्यात आले आहेत. तसेच, संबंधित प्रकरणाचा पुढील तपास सुरू असल्याची माहिती आहे. आता, पोलिसांनी नागरिकांना आवाहन केलं आहे की, मॅट्रिमोनियल साईटवर दिसणाऱ्या ओळखीच्या प्रोफाइलवर लगेच कोणावरही विश्वास ठेवू नका आणि कोणत्याही प्रकारचे आर्थिक व्यवहार करताना अत्यंत सावधगिरी बाळगा.

पाचवीत शिक्षण घेणाऱ्या अल्पवयीन विद्यार्थिनीवर बसमध्ये विनयभंग, पीडितेनं सांगितला घटनेचा थरार

विद्यार्थिनीच्या विनयभंगामुळे आरोपीच्या मुसक्या आवळल्या

पीडितेनं घरी पोहोचताच घडलेला घटनाक्रम पालकांना सांगितला. त्यानंतर पीडितेच्या पालकांनी मध्यरात्री बदलापूर पश्चिम पोलीस ठाणे गाठून आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला. या प्रकरणी पोलिसांनी तात्काळ कारवाई करत वांगणीत राहणाऱ्या आरोपीच्या मुसक्या आवळल्या. संबंधित आरोपी हा गेली आठ वर्षांपासून बस ड्रायव्हर म्हणून करत होता.

बदलापूर। बदलापूर शहरात इयत्ता पाचवीत शिक्षण घेणाऱ्या एका अल्पवयीन विद्यार्थिनीवर शाळेच्या बस चालकाने विनयभंग केला. या प्रकरणी ३८ वर्षीय बस चालक जयेश मुने याला पोलिसांनी अटक करून कल्याण न्यायालयात हजर करण्यात करण्यात आले. या प्रकरणात आरोपीला २ मार्चपर्यंत पोलीस कोठडीत सुनावली आहे. ही घटना बुधवारी सायंकाळी शाळा सुटल्यानंतर घडल्याचे वृत्त आहे.



विद्यार्थिनींच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर

अशा घटनेनं लहान विद्यार्थिनींच्या सुरक्षेचा प्रश्न आता ऐरणीवर आला आहे. बसमध्ये शाळेतील विद्यार्थिनींच्या सुरक्षेसाठी महिला मदतनीस असणे गरजेचे आहे. ही घटना घडली तेव्हा बसमध्ये महिला मदतनीस नव्हती, त्या महिलेच्या अनुपस्थितीमुळे अशी लज्जास्पद घटना घडली. या प्रकरणी आता पोलिसांनी बस मालक तसेच शाळा व्यवस्थापनालाही नोटीस बजावून चौकशीसाठी बोलावले आहे.

या प्रकरणाचा तपास सहाय्यक पोलीस आयुक्त शैलेश काळे यांच्याकडे सोपवण्यात आला. आरोपीने इतर आणखी किती विद्यार्थिनींसोबत असे कृत्य केले याचा पोलीस तपास घेत आहेत. आरोपीच्या मोबाईलचे पुरावे तपासले जात असून संभाव्य पीडितांचा शोध घेतला जात आहे.

कल्याणमध्ये तरुणीवर अत्याचाराचा प्रयत्न; गतिमंद भावाला मारहाण, पाच जणांविरोधात गुन्हा



कल्याण। कल्याण पूर्वेतील सूचक नाका परिसरात बियार्णी आणण्यासाठी गेलेल्या तरुणीवर आणि तिच्या गतिमंद भावावर पाच जणांनी हल्ला करून तरुणीवर अत्याचाराचा प्रयत्न केल्याची धक्कादायक घटना सोमवारी मध्यरात्री घडली. या प्रकरणी कोळसेवाडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून दोघांना ताब्यात घेण्यात आले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, २१ वर्षीय तरुणी आपल्या २९ वर्षीय गतिमंद भावासोबत स्कूटरवरून बियार्णी घेण्यासाठी गेली होती. त्यावेळी एका रिक्षामधील पाच जणांनी त्यांचा पाठलाग सुरू केला. नेतिवली येथील पाण्याच्या टाकीजवळ रस्ता संपल्याने त्यांना थांबावे लागले.

या संधीचा फायदा घेत आरोपींनी रिक्षामधून उतरून तरुणीच्या भावाला लोखंडी रॉड तसेच लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण केल्याचे समोर आले आहे. आपल्या भावाला वाचवण्यासाठी गेलेल्या तरुणीला आरोपींनी केसाला धरून ओढत निर्जनस्थळी नेले आणि तिच्यावर अत्याचाराचा प्रयत्न केला. दरम्यान, आरोपींनी तरुणीचा मोबाईल हिसकावून तो एअरप्लेन मोडह्लवर टाकला. आम्ही पोलिसांचे मित्र आहोत, पोलीस आमच्या हातात आहेत, अशी धमकी देत आरोपींनी तरुणीचे अश्लील व्हिडीओही तयार केल्याचा आरोप करण्यात आला आहे. तक्रार केल्यास ते व्हिडीओ व्हायरल करण्याची धमकीही देण्यात आली. या दरम्यान मदतीसाठी आलेल्या एका दुचाकीस्वारालाही आरोपींनी मारहाण करत त्याची दुचाकी फोडल्याचे सांगण्यात येत आहे.

तरुणीने आपल्या आईला लोकेशन पाठवल्याचे समजताच आरोपींपैकी एकाने पोलिसांना फोन केल्याची माहितीही समोर आली आहे. घटनास्थळी पोहोचलेल्या पोलिसांनी आरोपींवर कारवाई करण्याऐवजी उलट पीडित भाऊ-बहिणीलाच रात्री बाहेर का फिरता, असा प्रश्न विचारत त्यांना तेथून पाठवून दिल्याचा आरोप पीडितांकडून करण्यात आला आहे. या प्रकारामुळे स्थानिक नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे. दरम्यान, पीडित तरुणीने घरी जाऊन संपूर्ण प्रकार सांगितल्यानंतर नातेवाईकांनी कोळसेवाडी पोलीस ठाण्यात धाव घेतली. त्यानंतर पोलिसांनी गुन्हा दाखल करून नितीन दिलीप बिरादार (३३) आणि अभिषेक राजकुमार सोनी (२४) या दोघांना ताब्यात घेतले आहे. तर सोहेल तांबोळी, बाबू आणि एका रिक्षाचालकाचा शोध सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली. या घटनेमुळे परिसरात महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला असून हलगर्जीपणा करणाऱ्या पोलीस कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी स्थानिकांकडून केली जात आहे.

रेल्वे पार्किंग कंत्राटदारावर पेव्हर ब्लॉकने जीवघेणा हल्ला; 'पीडी'सह सहा जणांविरुद्ध गुन्हा



कल्याण। जुन्या वैमनस्यातून रेल्वे वाहनतळाचे कंत्राट घेणाऱ्या व्यावसायिकावर सहा जणांच्या टोळीने पेव्हर ब्लॉकने हल्ला करून गंभीर जखमी केल्याची घटना कल्याणमधील आधारवाडी परिसरात घडली. या प्रकरणी गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या प्रशांत देशमुख उर्फ ह्यपीडीह्ल याच्यासह सहा जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जखमी विशाल नायडू (३६) यांच्यावर खासगी रुग्णालयात उपचार सुरू असून त्यांच्या डोक्याला नऊ टाके पडले आहेत. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, विशाल नायडू हे कल्याण पश्चिमेतील गायकरपाडा परिसरात कुटुंबासह राहतात आणि रेल्वे वाहनतळाचे कंत्राट घेतात. त्यांच्या तक्रारीवरून प्रशांत देशमुख उर्फ पीडी, प्रतिक ठाकरे, शुभम नाडे, सुजय कदम, अक्षय तेजी तसेच दोन अनोळखी इसमांविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमान्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. तक्रारीनुसार, नायडू आणि प्रशांत देशमुख यांची ओळख सुमारे सहा वर्षांपासून आहे. मात्र २०२२ मध्ये देशमुखचा मित्र प्रतिक ठाकरे याने नायडू यांच्या मित्रावर हल्ला केल्याच्या घटनेनंतर दोघांमधील संबंध बिघडले होते. दरम्यान, होळीच्या दिवशी रात्री देशमुख यांनी नायडू यांना फोन करून शिवीगाळ करत धमकी दिली आणि तातडीने भेटण्याचा आग्रह धरला. मात्र नायडू यांनी नंतर भेटू असे सांगितल्याने देशमुख यांनी फोन बंद केला. यानंतर रात्री साडेअकराच्या सुमारास नायडू हे चायनिज पदार्थ घेण्यासाठी आधारवाडी सर्कल परिसरात गेले असता संदीप चायनिज सेंटरजवळ आरोपींची टोळी उभी होती. प्रतिक ठाकरे याने नायडू यांना थांबवून शिवीगाळ केली आणि जवळच पडलेला पेव्हर ब्लॉक उचलून त्यांच्या डोक्यात मारला.

पोलीस बातमी पत्र

पोलीस बातमी पत्र

विविध

२

मुंबई, मंगळवार, १७ मार्च २०२६ ते २३ मार्च २०२६

घसादुखीवर 'हे' झटपट घरगुती उपाय नक्की येतील कामी

ऋतू बदलले की शरीराच्या अनेक समस्या उद्भवतात. तसेच थंडीत अंगदुखी, पाठदुखीसोबत घसा खवखवणे, घसा दुखणे असे आजार देखील उद्भवतात. अशा वेळी आपल्याला कधी कधी गिळताना, बोलताना घशाला त्रास होतो. यालाच Throat inffection असेही म्हणतात. साधारणतः सर्दी, खोकला याप्रमाणे हा घशाला होणारा त्रास हे देखील व्हायरल इन्फेक्शन आहे. हे इन्फेक्शन काही दिवसांत आपोआप कमी होते. यामुळे याच्यावर काही इलाज करु नये असेही नाही. त्या समस्येकडे लक्ष न दिल्यास घशाला सूज येणे, टॉन्सिल्स लाल होणे, त्यावर पांढरे चट्टे येणे यांसारखे गंभीर आजार होऊ शकतात. अशा वेळी मग यावर त्वरित काय उपाय करता येईल अशा प्रश्न अनेकदा पडतो. म्हणूनच यावर झटपट घरगुती उपाय कोणते करता येईल ते पाहूया..

१. घशाला सूज उतरवण्यासाठी गरम पाणी पिण्याचे व हळद मिठाच्या पाण्याच्या गुळण्या करता येतील.

२. घसा दुखत असल्यास तोंडात आल्याचा तुकडा ठेवल्यास थोडा आराम मिळतो.

३. आलं, टोमॅटो आणि मधाचा रस एकत्र करून घेतल्याने घसादुखीपासून आराम मिळतो.

४. मध आणि कांदा टाकून उकळलेलं पाणी गाळून ते थोड्या-थोड्या वेळाने प्यावे.

५. पाण्यात बडीशेप टाकून ते पाणी उकळून घ्यावं आणि त्यानंतर त्यात मध टाकून हे पाणी थोड्या थोड्या वेळाने प्यावे. याने घशाला आराम मिळेल.

याप्रमाणेच लिंबाचा रस आणि मध टाकलेले गरम पाणी प्यायल्यानेही घशाला आराम मिळतो. लवंग चघळल्यानेही घसादुखी कमी होते. थंडीत तुम्हाला जर तुम्हाला घसादुखीचा त्रास उद्भवत असेल तर हे उपाय नक्कीच मदत करतील.

शरीरात युरिक ॲसिडचे प्रमाण वाढले असेल तर या नॅचरल ड्रिंक्सने बॉडीला करा डिटॉक्स

योग्य खानपान आणि औषधांमुळे तुम्ही शरीरात तयार होणाऱ्या युरिक ॲसिडच्या स्तराला नियंत्रित करू शकता. युरिक ॲसिडची अधिकता शरीराला बऱ्याच प्रकारे नुकसान पोहोचवते. आम्ही तुम्हाला अशा काही नॅचरल ड्रिंक्सबद्दल सांगत आहोत ज्याचे सेवन केल्याने शरीरातील युरिक ॲसिडचे स्तर कमी होतील आणि तुम्हाला त्याचा योग्य फायदा देखील मिळेल.



नारळपाणी

युरिक ॲसिडच्या स्तराला नियंत्रित करण्याचा सर्वात उत्तम उपाय पाणी आहे. पाण्याशिवाय नारळपाणी देखील युरिक ॲसिडला नियंत्रित करतो. हे युरिक ॲसिडला पातळ करून किडनीला उत्तेजित करतात ज्यामुळे शरीरातून युरिक ॲसिड मूत्राच्या माध्यमाने बाहेर निघून जाते.

मोसंबी आणि पुदिना

या ड्रिंकमध्ये पर्याप्त मात्रेत व्हिटॅमिन असतात, जे युरिक ॲसिडच्या स्तराला कमी करण्यास मदत करतात. याचे सेवन करण्यासाठी मोसंबीचे साल काढून त्याच्या बारीक बारीक फोडी करून त्यात लिंबाचा रस आणि पुदिन्याचे पान घालावे व या मिश्रणाला मिक्सरमधून फिरवून त्याचा ज्यूस काढावा व त्याचे सेवन करावे.

ब्लॅक चेरी आणि चेरी

ब्लॅक चेरी आणि चेरीचा ज्यूस युरिक ॲसिडमुळे होणारे संधिवात किंवा किडनी स्टोनच्या समस्येसाठी योग्य आहे. ब्लॅक चेरी युरिक ॲसिडच्या सीरम स्तराला कमी करून संधिवात आणि किडनीहून क्रिस्टल दूर करण्यास मदत करते. यात अँटीऑक्सिडेंट आणि अँटी इंफ्लेमेंटरी गुणदेखील असतात, जे युरिक ॲसिडला कमी करण्यास मदत करतात.

खिऱ्याचे सूप

खिऱ्याचे सूप शरीराला हायड्रेड ठेवण्यासोबत युरिक ॲसिडच्या स्तराला कमी करतो. याचे सेवन करण्यासाठी एका भांड्यात खिऱ्याचा ज्यूस, पाव कप योगर्ट, पुदिन्याचे पान आणि लिंबाचा रस घालून मिक्सरमधून फिरवून घ्या आणि थोड्या वेळाने गार झाल्यावर त्याचे सेवन करा.

सेबचा सिरका

सेबचा सिरका शरीरातून युरिक ॲसिडला दूर करण्यास मदत करतो. अँटीऑक्सिडेंट आणि एंटीइंफ्लेमेंटरी गुणांमुळे हे शरीरात क्षारीय ॲसिड संतुलन बनवून ठेवतो. हा सिरका रक्ताच्या पीएच वॉल्यूमला वाढवून युरिक ॲसिडला कमी करण्यास मदत करतो.

अननसाचा ज्यूस

या ज्यूसमध्ये व्हिटॅमिन सी सोबत इतर अँटीऑक्सिडेंट असतात जे युरिक ॲसिडच्या स्तराला कमी करून शरीरातून बाहेर काढण्यात मदत करतात. याचे सेवन केल्याने शरीराला दुसरे इतर फायददेखील मिळतात.

नाश्त्यामध्ये ब्रेड, कॉर्नफ्लेक्स खाणे शरीरासाठी हानीकारक



सकाळच्या नाश्त्यामध्ये अधिक जणांना ब्रेड, कॉर्नफ्लेक्स आणि अनेक तळलेले पदार्थ खाण्याची सवय असते. मात्र हे पदार्थ फुफ्फुसाच्या कॅन्सरला कारणीभूत ठरत असल्याचे नव्या संशोधनात समोर आलेय. व्हाईट ब्रेड, कॉर्नफ्लेक्स असे ग्लायसेमिक इंडेक्सयुक्त पदार्थ खाल्ल्याने फुफ्फुसाचा कॅन्सर वाढण्याची शक्यता असते. संशोधनादरम्यान ज्यांना हा आजार झाला होता अशा एक हजार ९०५ जणांना समाविष्ट केले होते. त्याचबरोबर दोन हजार ४१३ स्वस्थ व्यक्तींचेही निरीक्षण करण्यात आले. यादरम्यान त्यांच्या आहाराच्या सवयी जाणून घेतल्या. शोधकर्त्यांचे म्हणणे आहे की तंबाखू तसेच धुम्रपान न करणाऱ्या लोकांमध्येही फुफ्फुसाच्या कॅन्सरची लक्षणे आढळली. ज्यावरून त्यांच्या आहाराच्या सवयी या कॅन्सरसाठी कारणीभूत असल्याची शक्यता आहे.

ओपनफेस सँडविच

तेच तेच पदार्थ खाऊन कंटाळा येतो. खास करून मुलांच्या डब्यात काय पदार्थ द्यावे हे सुचत नाही. पोळीभाजी नको, पराठे खाऊन कंटाळा आला, सँडविच काय तेच तेच.. मग असे करायचे की हे पदार्थ वेगळ्या रूपात द्यायचे. आता सँडविच. नेहमीचे कसे असते, बटाटा, चटणी, काकडीबरोबर नाही का! मग सँडविचला वेगळे रूप द्यायचे. नेहमीचे सँडविच बंद असते, हे ओपनफेस ठेवायचे.



साहित्य

– उकडलेला बटाटा, सिमला मिरची, गाजर, फरसबी, चाट मसाला, चिली फ्लेक्स, जिरे पूड, लसूण, मीठ, लिंबू, ब्रेड, चिझ किंवा बटर.

कृती – उकडलेला बटाटा किसून त्यात हवी तर सिमला मिरची, गाजर, फरसबी काहीही घाला. मात्र अत्यंत बारीक चिरून. आता यात हवा तो मसाला टाका. चाट मसाला, ड्राय हॅर्ब्स, चिली फ्लेक्स, जिरे पूड, लसूण, मीठ, लिंबू रस चांगले एकत्र केले की ब्रेडचे लांबट तुकडे करा. त्यावर हे मिश्रण थापा. वरून चीझ किसून घाला अथवा थोडे बटर घाला. साधारण ग्रील करा किंवा तव्यावर शेकवून द्या. हे सँडविच मेयो किंवा चटणीसोबत खायला द्या.

वॅक्सिंगऐवजी शेव्हिंगचा पर्याय वापरत असाल तर या गोष्टी ठेवा लक्षात

शरीरावर जाड केस येणे होईल नाहीसे

आता लवकरच उन्हाळा सीझन सुरू होईल, समर वाइब्सनुसार आपणही शॉर्ट्स, क्युट ड्रेसेस घालून बाहेर पडण्याच्या विचारात असाल, अशावेळी पायावर जाड केस असले तर असे कपडे कसे घालू? असा प्रश्नही तुम्हाला साहजिक पडेलच. मग अगदी आयत्या वेळी पार्लरमध्ये जाण्याऐवजी आपण घरीच रेझर घेऊन शेव्हिंगचा पर्याय निवडाल, वास्तविक यात काही हरकत नाही, मात्र अनेकदा शेव्हिंगमुळे पुन्हा अंगावर येणारे केस हे नियमित लवेपेक्षा जाडसर येतात आणि पुढच्या वेळी हेच केस पुन्हा काढून टाकताना त्वचेला त्रास होतो. असं होऊ द्यायचं नसल्यास तुम्हाला शेव्हिंगवेळी फक्त काही सोप्या टिप्स लक्षात ठेवण्याची गरज आहे. अनेक महिलांना वॅक्सिंगमुळे त्रास होतो, तर हेअर रिमूव्हल क्रीम्समुळे त्वचा काळवंडते, असाही काहींचा अनुभव असतो, यावर पर्याय म्हणून रेझरचा वापर हा त्यातल्या त्यात सेफ म्हणता येईल. फक्त रेझर योग्य पद्धतीने वापरला जातोय का, याकडे लक्ष देणे गरजेचे आहे. ही योग्य पद्धत कोणती आणि शेव्हिंग करताना कोणत्या गोष्टी लक्षात ठेवावयाच्या, हे जाणून घ्या..



कसा वापराल रेझर?

रेझर फिरवताना ज्या दिशेने केस येतात त्या दिशेनेच फिरवा, यामुळे केस मुळासकट निघून जायला मदत होते आणि पुढील वेळेस जाड केस येत नाहीत. रेझर फिरवताना दुखापत होईल इतका जोर लावू नका. हात, पाय, अंडरआर्म्स, गुप्तांग अशा सर्वच ठिकाणी एकच रेझर वापरू नका. ब्लेड चेंज करणारे रेझर वापरत असाल तर एखादे ब्लेड तीन ते जास्तीत जास्त चार वेळा वापरा. त्यावर नको. शेव्हिंग प्रोसेस सोपी करतील असे मार्ग -

▮जो भाग शेव्ह करायचा आहे तो पाण्याने भिजवा यामुळे केस नरम होतील.

▮हात किंवा पाय, अंडरआर्म्स, प्रायव्हेट पार्टवरील केस काढायचे असतील तरी आधी त्यावर कमी केमिकल्स असलेले शेव्हिंग फोम वापरा, मगच केसांवर रेझरचा वापर करा. यामुळे केस नरम होतात आणि पटकन निघून जातात.

▮शेव्हिंग केल्यानंतर तुमच्या त्वचेची छिद्रे उघडतात. त्यात धूळ जाऊ नये किंवा कोरडेपणा येऊ नये, रेडनेसचा त्रास होऊ नये म्हणून चांगले मॉइश्चरायझर त्वचेला लावा.

मिठाई बनवताना साखरेऐवजी

वापरा खजुराची पेस्ट

आपल्या दैनंदिन आहारामध्ये साखरेचा वापर होत असतो. चहा, कॉफी, आणि मुख्य म्हणजे आपल्या आहारातील बहुतेक सर्वच गोड पदार्थांमध्ये साखरेचा वापर नियमित केला जात असतो. केवळ घरी तयार करण्यात आलेल्या पदार्थांतच नव्हे, तर ब्रेड, बिस्किटे, तयार सॉसेस, सँडविच स्प्रेड्स, पॅकेज्ड फळांचे रस, कोल्ड ड्रिंक्स यांमध्येही साखरेचे प्रमाण जास्त असते. रिफाईन्ड साखर अतिप्रमाणात खाल्ल्याने आरोग्याला धोका निर्माण होत असून, तरुण वयातच उच्च रक्तदाब, मधुमेह, इत्यादी विकार उद्भवण्याचे प्रमाण



आहारामध्ये साखर जास्त असल्याने चेहऱ्यावर अकाली सुरकुत्या येणे, वारंवार मुरुमे, पुटकुळ्या येणे, इत्यादी लक्षणे दिसू लागतात. त्यामुळेच आहारतज्ज्ञ दैनंदिन आहारामधून साखरेचे प्रमाण कमी करून साखरेऐवजी नैसर्गिक स्वीटनर्स वापरण्याचा सल्ला देत असतात. नैसर्गिक स्वीटनर्समध्ये अनेक पर्याय उपलब्ध असून त्यामध्ये खजुराच्या पेस्टचा समावेश करता येऊ शकतो.

खजुराची विशेषता

अशी की त्यामध्ये नैसर्गिक शुगर्ससोबत प्रथिने, फायबर, झिंक, मॅग्नेशियम इत्यादी क्षारही आहेत. शंभर ग्रॅम खजुरामध्ये २८२ किलो कॅलरीज इतकी ऊर्जा असते. त्यामुळे खजुरापासून तयार केली गेलेली पेस्ट किंवा सिरप रिफाईन्ड साखरेऐवजी वापरली जाऊ शकते. खजुराची पेस्ट घरच्या घरी तयार करण्यासाठी केवळ खजूर आणि स्वच्छ पाणी, इतक्याच साहित्याची आवश्यकता आहे. खजुराची पेस्ट बनवण्यासाठी ताजा पिकलेला खजूर पाण्यामध्ये भिजवून ठेवावा. खजूर भिजवण्याआधी त्याच्यातील बिया काढून टाकाव्यात. त्यानंतर गरम पाण्यामध्ये खजूर भिजवावा. हा खजूर रात्रभर पाण्यामध्ये भिजू द्यायचा आहे.

दुसऱ्या दिवशी सकाळी खजूर पाण्यातून काढून घेऊन मिक्सरवर बारीक वाटावा. खजूर भिजवून ठेवलेले पाणी टाकून न देता हे पाणी खजूर मिक्सरवर वाटत असताना घालावे. आवश्यक तितके पाणी घालून आपल्याला हवी तितकी घट्ट किंवा पातळ पेस्ट तयार करून घ्यावी.

या पेस्टमध्ये किंचित मीठ, आवडत असल्यास मध, किंवा दालचिनीची पूड मिसळता येईल. यामुळे या पेस्टला वेगळीच चव येते. खजुराचे सिरप तयार करण्यासाठी खजूर पाण्यामध्ये उकळून घ्यावेत.

त्यानंतर खजूर उकळलेले पाणी गाळून घेऊन खजुराचा गर वेगळा करावा. गाळलेले पाणी

मनुके खाण्यास जेवढे स्वादिष्ट आहेत, तेवढेच अन्य ड्रायफ्रुटच्या तुलनेत स्वस्त देखील आहेत. मनुक्यांचा वापर अनेकदा गोड पदार्थांमध्ये केला जातो. याचा स्वाद पदार्थाला चवदार बनवतो. याव्यतिरिक्त मनुके खाण्याचे अनेक फायदे आहेत. हे फायदे जाणून घेऊया...

जाणून घ्या फायदे मनुके खाण्याचे



शरीराला ताकद मिळते – दररोज मनुके खाल्ल्याने शरीराला ताकद मिळते. मनुक्यात नैसर्गिक साखर असते, जी सहज पचते. यामुळे शरीराला त्वरित ऊर्जा मिळते. मनुक्यात कोलेस्ट्रॉल नसते, ज्यामुळे हृदयाची समस्या असलेल्या रुग्णांसाठी हे चांगले आहे.

बद्धकोष्ठता असणाऱ्यांसाठी फायदेशीर – जर तुम्हाला बद्धकोष्ठता असेल तर मनुके खूपच फायदेशीर आहेत. बद्धकोष्ठतेची समस्या दूर करण्यासाठी मनुके एकप्रकारचे वरदान आहे. मनुक्यांना भिजवून खाल्ल्याने अधिक फायदा होतो.

वजन कमी करण्यासाठी – मनुक्यातील नैसर्गिक साखर तुमच्या शरीराला नुकसान पोहचवत नाही. यामुळे याचे नियमित सेवन केल्याने तुमचे वजन देखील कमी होते.

हाडे मजबूत होतात – हाडे मजबूत करायची असतील तर मनुक्यांचे सेवन नक्की करा. मनुक्यात कॅलिशियमचे प्रमाण अधिक असते. त्यामुळे याचे सेवन दररोज करावे.

फोन चोरी झाल्यास अशा प्रकारे करा बँक डिटेल्स आणि मोबाईल वॉलेटचे रक्षण

तुमचा फोन चोरीला गेल्यास सर्वप्रथम तुमचं सिम कार्ड ब्लॉक करा. तसेच मोबाईल बँकिंग, यूपीआय पेमेंट आणि मोबाईल वॉलेट ब्लॉक करा. फोन चोरी झाल्याची तक्रार नजीकच्या पोलीस स्टेशनमध्ये करायला विसरू नका.

हल्ली चोर तुमचा फोन मिळाल्यावर फक्त एकच गोष्ट शोधतात ते म्हणजे तुमचे बँक डिटेल्स. सध्या डिजिटल पेमेंट होत असल्यामुळे एकाच डिव्हाइसमध्ये वेगवेगळ्या ॲप्सचा समावेश असतो. स्मार्टफोन चोरण्यासाठी या डिजिटल वॉलेटपर्यंत पोहोचणं इतकं कठीण नाही. अशा अनेक वाईट घटना देखील घडल्या जिथे फोन चोरीला गेल्यावर बँक डिटेल्स मिळवून चोराने बँक अकाऊंट रिकामं केलं.

अशा प्रकारच्या धोक्यापासून वाचण्यासाठी काही गोष्टी लक्षात ठेवल्या पाहिजेत आणि फोन चोरीला गेल्यावर त्या केल्या पाहिजेत. जर तुमचा फोन हरवला किंवा चोरीला गेला तर तुम्ही पुढील पद्धती अवलंबून तुमच्या फोन किंवा त्यातील डेटाचा गैरवापर टाळू शकता.

सिम कार्ड ब्लॉक करा

फोन हरवल्यावर फोन नंबरचा गैरवापर टाळणं अत्यंत महत्त्वाचं आहे. सिम कार्ड ब्लॉक केल्यास फोनवरील प्रत्येक ते ॲप ब्लॉक करता येतात, जे ओटीपीच्या माध्यमातून ॲक्सेस केले जाऊ शकतात. तुम्ही नवीन सिम कार्डवर जुना नंबर मिळवू शकता. त्यासाठी काही वेळ लागू शकतो, परंतु तुमच्या प्रायव्हसीसाठी आणि मोबाईल वॉलेटच्या सुरक्षेसाठी सिम कार्ड ब्लॉक करणं अत्यंत आवश्यक आहे.

मोबाईल बँकिंग सर्व्हिस बंद करा

फोन चोर तुमचे बँक डिटेल्स सहज मिळवू शकतो, त्यामुळे बँक सर्व्हिस तत्काळ बंद करणं आवश्यक आहे. तुमचे सिम कार्ड आणि मोबाईल बँकिंग ॲप सिंक असतात, त्यामुळे रजिस्टर्ड नंबरवरील ओटीपीविना कोणीतही रक्कम ट्रान्सफर करणं कठीण आहे. परंतु फोन हरवल्यावर दोन्ही ब्लॉक करणे उत्तम.



यूपीआय पेमेंट डीॲक्टिव्हेट करा

जेव्हा तुम्ही ऑनलाइन बँकिंग सेवेपर्यंत पोहचू देत नाही तेव्हा चोर इतर मार्ग शोधू लागतो, ज्यात यूपीआयसारख्या पेमेंट ऑप्शनचा समावेश असतो. त्यामुळे थोडासाही वेळ न दवडता यूपीआय पेमेंट डीॲक्टिव्हेट करा. यासाठी तुम्हाला तुमच्या बँकेशी संपर्क साधावा लागेल.

सर्व मोबाईल वॉलेट्स ब्लॉक करा

मोबाईल वॉलेट्समुळे आयुष्य सोपं झालंय, परंतु जर तुमचा फोन चुकीच्या हाती पडला तर गुगल पे आणि पेटीएमसारखे मोबाईल वॉलेट महागात पडू शकतात. संबंधित ॲपच्या हेल्प डेस्कशी संपर्क करा आणि जोपर्यंत तुम्ही नवीन डिव्हाइसवर वॉलेट पुन्हा सेट करत नाही, तोपर्यंत ते ब्लॉक करण्यास सांगा.

पोलिसांत तक्रार करा

या सर्व स्टेप्स फॉलो केल्यावर पोलीस अधिकाऱ्यांना तुमच्या चोरी झालेल्या डिव्हाइसची माहिती द्या. तुम्ही जवळच्या पोलीस स्टेशनमध्ये फोन चोरी झाल्याची तक्रार करू शकता आणि एफआयआरची प्रत त्यांच्याकडून घेऊ शकता. जर तुमच्या फोनचा गैरवापर झाला किंवा तुमच्या फोनच्या माध्यमातून पैसे चोरीला गेले तर ही कॉपी पुरावा म्हणून वापरता येईल.

पोलीस बातमी पत्र

महामुंबई

३

मुंबई, मंगळवार, १७ मार्च २०२६ ते २३ मार्च २०२६

संपादकीय

स्वच्छ, शाश्वत ऊर्जास्रोत



संपादक दिपक मोरेश्वर नाईक



भारताने अणुऊर्जा क्षेत्रात मोठी प्रगती केली आहे. तारापूर येथे पहिले अणुऊर्जा केंद्र सुरू झाले. स्वदेशी तंत्रज्ञानाचा विकास झाला. आता ७०० मेगावॉट क्षमतेच्या अणुभट्ट्या उभारल्या जात आहेत. रशियाच्या मदतीनेही प्रकल्प सुरू आहेत. संयुक्त राष्ट्रांनी ठरवलेली शाश्वत विकास उद्दिष्ट्ये पूर्ण करताना हवामान बदल आणि पर्यावरणाचे रक्षण करणे महत्त्वाचे आहे. यापैकी एक उद्दिष्ट म्हणजे सर्वांना स्वच्छ आणि स्वस्त ऊर्जा मिळावी. हे उद्दिष्ट साधल्यास इतर सर्व उद्दिष्ट्ये पूर्ण करणे सोपे होते. विकसित देश म्हणून गणले जाण्यासाठी दरडोई वार्षिक ऊजार्वापर हा एक महत्त्वाचा निकष आहे. या निकषावर भारत अजून खूप मागे आहे. त्यामुळे भारतासमोर ऊर्जेचा पुरवठा वाढवणे आणि तो पर्यावरणाला अनुकूल स्रोतांतून करणे, ही दुहेरी उद्दिष्ट्ये आहेत. सौर आणि पवन ऊर्जा हे स्वच्छ ऊर्जा स्रोत लवकर उभारता येतात, पण त्यांच्यात ऊर्जेच्या पुरवठ्यातील अनियमितता आणि मोठ्या जागेची गरज यांसारख्या मयार्दा आहेत. याउलट, अणुऊर्जा कमी कार्बन उत्सर्जन करते, कमी जमीन वापरते आणि वर्षभर मोठ्या प्रमाणात ऊर्जा पुरवू शकते. हा एक सिद्ध झालेला आणि भारतात विकसित झालेला ऊर्जा स्रोत आहे. १९५४ मध्ये अणुऊर्जा विभागाची स्थापना झाली आणि तेव्हापासून भारताने अणुतंत्रज्ञान विकसित करण्यावर भर दिला आहे. अणुऊर्जा प्रकल्प केवळ दीर्घकालीन ऊर्जा सुरक्षाच देत नाहीत, तर आरोग्य, अन्नसुरक्षा आणि इतर अनेक क्षेत्रांमध्येही मोठे सामाजिक फायदे देतात. अमेरिकेच्या मदतीने तारापूर येथे १९६९ मध्ये पहिले अणुऊर्जा केंद्र सुरू झाले. त्यानंतर कॅनेडियन हेवी वॉटर रिऍक्टर तंत्रज्ञानावर लक्ष केंद्रित केले गेले. सुरुवातीला कॅनडा आणि अमेरिकेने मदत केली, पण १९७४ च्या अणुचाचणीनंतर त्यांनी पाठिंबा काढून घेतला. तरीही, भारताने स्वतःच्या कौशल्यावर आधारित अणुइंधन उत्पादन आणि औद्योगिक क्षमता वाढवली. आता भारतात ७०० मेगावॉट क्षमतेच्या अणुभट्ट्या उभारल्या जात आहेत. फास्ट ब्रीडर रिऍक्टर तंत्रज्ञानही विकसित झाले आहे आणि ५०० मेगावॉट क्षमतेचे युनिट लवकरच कार्यान्वित होईल. रशियाच्या मदतीने १००० मेगावॉट क्षमतेचे दोन प्रेशराइज्ड वॉटर रिऍक्टर युनिट्सही उभारले जात आहेत. अणुऊर्जा विभागाने संशोधन, अभियांत्रिकी, बांधकाम आणि संचालन या सर्वच बाबतीत कौशल्य मिळवले आहे. ६५० हून अधिक अणुभट्टी वर्षांचा सुरक्षित आणि उच्च-क्षमतेचा अनुभव हे याचेच द्योतक आहे. अणुऊर्जा नियामक मंडळाच्या कडक नियमांमुळे आणि सुरक्षिततेच्या संस्कृतीमुळे हे शक्य झाले आहे. केंद्र सरकारने अणुऊर्जा क्षमतेचा विस्तार करण्याचा घेतलेला निर्णय स्वागतार्ह आहे. भारतीय तंत्रज्ञांमध्ये अणुऊर्जा क्षेत्रातील गुंतागुंतीचे तंत्रज्ञान विकसित करण्याची क्षमता आहे. ते उच्च सुरक्षा मानके आणि आव्हानात्मक औद्योगिक प्रक्रिया हाताळण्यात पारंगत आहेत. अणुऊर्जा प्रकल्पातील सुरक्षितता म्हणजे किरणोत्सर्गापासून मनुष्य आणि पर्यावरणाचे संरक्षण. हे डिझाइनपासून ते प्रकल्पाच्या अखेरपर्यंत सर्व टप्प्यांवर जपले जाते. उपकरणांची विश्वासार्हता महत्त्वाची आहे, कारण ती संयंत्रांच्या कार्यकाळात सहज उपलब्ध नसतात आणि वीजनिर्मिती नसतानाही ती बंद पडू नयेत. उच्च किरणोत्सर्गी इंधनाच्या सुरक्षिततेसाठी, अणुभट्टीतून बाहेर काढल्यानंतरही, विश्वासार्ह शीतलक साधनांची गरज असते. अणुऊर्जा क्षेत्रातील नवीन कंपन्यांनी सिद्ध झालेले तंत्रज्ञान आणि प्रशिक्षित टीम्सवर लक्ष केंद्रित करावे. अणुऊर्जा विभागातील अनुभवी लोकांचे मार्गदर्शन त्यांना उपयुक्त ठरेल. १०० गिगावॉट वीज निर्मिती क्षमता गाठण्यासाठी अणुऊर्जा विभागाने या राष्ट्रीय सामथ्यार्ला अधिक गती देणे आवश्यक आहे.

भारतासमोर ऊजेर्ची वाढती मागणी पूर्ण करणे आणि त्याच वेळी पर्यावरणाचे रक्षण करणे, ही एक मोठी जबाबदारी आहे. संयुक्त राष्ट्रांनी ठरवलेली शाश्वत विकास उद्दिष्ट्ये याच दिशेने वाटचाल करतात. या उद्दिष्टांमध्ये स्वच्छ आणि परवडणारी ऊर्जा मिळवणे हे एक महत्त्वाचे लक्ष्य आहे. जर आपण हे लक्ष्य गाठले, तर इतर अनेक सामाजिक आणि पर्यावरणीय उद्दिष्ट्ये आपोआपच पूर्ण होऊ शकतात. विकसित देश म्हणून गणले जाण्यासाठी दरडोई वार्षिक ऊजार्वापर हा एक महत्त्वाचा निकष आहे. या निकषावर भारत अजूनही खूप मागे आहे, हे वास्तव स्वीकारायला हवे. त्यामुळे, भारताला एकाच वेळी दोन आघाड्यांवर लढावे लागत आहेः एक म्हणजे ऊजेर्चा पुरवठा वाढवणे आणि दुसरे म्हणजे हा पुरवठा पर्यावरणाला हानी न पोहोचवणाऱ्या स्रोतांतून करणे. सौर ऊर्जा आणि पवन ऊर्जा हे स्वच्छ ऊजेर्चे उत्तम स्रोत आहेत. त्यांची उभारणी तुलनेने लवकर करता येते. मात्र, या ऊर्जा स्रोतांच्या काही मोठ्या मर्यादा आहेत. ऊर्जेच्या पुरवठ्यात अनियमितता असू शकते, म्हणजे जेव्हा ऊन नसेल किंवा वारा नसेल, तेव्हा वीज निर्मिती थांबते. तसेच, मोठ्या प्रमाणात वीज निर्मितीसाठी खूप मोठ्या जमिनीची आवश्यकता असते. या समस्यांवर मात करण्यासाठी अणुऊर्जा एक चांगला पर्याय ठरू शकते. अणुऊर्जा प्रकल्पांमधून कार्बन उत्सर्जन जवळजवळ नसते. ते कमी जमीन वापरतात आणि वर्षभर मोठ्या ह्यालोड फॅक्टरह्लवर (load factor - वीज निर्मिती क्षमतेचा किती टक्के वापर होतो) ऊर्जा पुरवू शकतात. हा एक सिद्ध झालेला आणि भारतात विकसित झालेला ऊर्जा स्रोत आहे. भारतात अणुऊर्जा क्षेत्राचा प्रवास १९५४ मध्ये अणुऊर्जा विभागाच्या स्थापनेपासून सुरू झाला. स्थापनेनंतर लगेचच, भारताने विकसित राष्ट्रांच्या बरोबरीने येण्यासाठी अणुतंत्रज्ञानाशी संबंधित सर्व घटक भारतातच विकसित करण्यावर भर दिला. यासाठी योग्य ती पावले उचलण्यात आली. गेल्या अनेक वर्षांपासून देशात अणुऊर्जा क्षेत्रात अत्यंत काळजीपूर्वक उभारलेली ही शक्तिस्थाने केवळ दीर्घकालीन ऊजासुंरक्षेची हमीच देत नाहीत, तर आरोग्य, अन्नसुरक्षा आणि इतर अनेक क्षेत्रांमध्येही मोठे सामाजिक फायदे देतात. भारतातील अणुऊर्जा प्रकल्पाचा पहिला टप्पा अमेरिकेच्या मदतीने सुरू झाला. १९६९ मध्ये महाराष्ट्रातील तारापूर येथे अमेरिकेच्या 'जनरल इलेक्ट्रिक कंपनी'ने पुरवलेल्या प्रत्येकी २०० मेगावॉट क्षमतेच्या दोन बॉयलिंग वॉटर रिऍक्टर युनिट्स असलेले पहिले अणुऊर्जा केंद्र कार्यान्वित झाले. याचा कार्यभार अणुऊर्जा विभागाने स्वीकारला. त्याच सुमारास, देशातील औद्योगिक क्षमतांचा विचार करून, स्वदेशीकरणाला सोयीस्कर ठरेल आणि भविष्यात प्रगत विकासाची शक्यता असलेल्या कॅनेडियन हेवी वॉटर रिऍक्टर तंत्रज्ञानावर लक्ष केंद्रित करण्याचा महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला. या कॅनेडियन तंत्रज्ञानावर आधारित, प्रत्येकी २२० मेगावॉट क्षमतेच्या पहिल्या दोन युनिट्सचे बांधकाम 'ॲटोमिक एनर्जी ऑफ कॅनडा लिमिटेड'च्या सहकार्याने करण्यात आले. विशेष म्हणजे, या युनिट्ससाठी आवश्यक असलेली काही महत्त्वाची उपकरणे भारतीय उद्योगांनीच तयार केली होती आणि त्यांचे बांधकाम, कार्यान्वयन आणि संचालन भारतीय तज्ज्ञांनीच केले होते. या प्रकल्पातील पहिल्या युनिटने १९७३ मध्ये व्यावसायिक वीज निर्मिती सुरू केली. मात्र, दुसरे युनिट पूर्ण होण्यापूर्वीच, भारताने १९७४ मध्ये केलेल्या पहिल्या अणुचाचणीनंतर कॅनडा आणि अमेरिकेने आपला पाठिंबा काढून घेतला. त्यानंतर मात्र, भारतात अणुऊर्जा तंत्रज्ञानाशी संबंधित प्रत्येक घटकांमध्ये तोपर्यंत विकसित झालेल्या कौशल्यामुळेच अणुइंधन उत्पादन आणि स्थानिक औद्योगिक क्षमता वाढीस लागली. हा कार्यक्रम 'मेड इन इंडिया' या धर्तीवर प्रगत पीएचडब्ल्यूआर अणुभट्ट्यांसह यशस्वी झाला. आता देशात ७०० मेगावॉट क्षमतेच्या पीएचडब्ल्यूआर अणुभट्ट्यांची मालिका उभारली जात आहे. या कौशल्याचा विस्तार फास्ट ब्रीडर रिऍक्टर तंत्रज्ञानापर्यंत झाला आहे. यातील पहिले ५०० मेगावॉट क्षमतेचे युनिट कार्यान्वित करण्याच्या अंतिम टप्प्यात आहे. याव्यतिरिक्त, रशियन फेडरेशनच्या सहकार्याने एक हजार मेगावॉट क्षमतेचे दोन प्रेशराइज्ड वॉटर रिऍक्टर युनिट्सदेखील उभारले जात आहेत. त्यांची बांधणी, वापर सज्जता आणि कार्यान्वयन भारतीय तज्ञांकडूनच केले जात आहे. सध्या अशा आणखी चार युनिट्सचे बांधकाम सुरू आहे. अणुऊर्जा विभागाने संशोधन आणि विकास, रचना, अभियांत्रिकी, बांधकाम आणि संचालन/कार्यान्वयन यांसारख्या विविध अणुऊर्जा तंत्रज्ञानामध्ये परिपक्वता मिळवलेली आहे. या परिपक्वतेमुळेच ६५० पेक्षा जास्त संचित अणुभट्टी वर्षांसाठी सुरक्षित आणि उच्च-क्षमतेचे संचालन शक्य झाले आहे. अणुऊर्जा नियामक मंडळाच्या प्रभावी नियामक पद्धती आणि कार्यरत संस्थांमधील मजबूत सुरक्षितता संस्कृतीचे हे उत्तम उदाहरण आहे. वषार्नुवर्षे काळजीपूर्वक विकसित करण्यात आलेल्या आत्मनिर्भर अणुऊर्जा क्षमतेचा विस्तार आणि वृद्धी करण्यासाठी अतिरिक्त घटकांचा समावेश करण्याचा केंद्र सरकारचा निर्णय अत्यंत स्वागतार्ह आहे. या गुंतागुंतीच्या तंत्रज्ञानाच्या विकासाच्या एका भागाशी असलेली माझी दीर्घकाळची बांधिलकी, नियामक कार्यपद्धतींशी असलेला संबंध आणि विविध प्रकारच्या उद्योगांशी संपर्क आणि इतर कौशल्यांचा अनुभव, यांमुळे अणुऊर्जा क्षेत्रात प्रवेश करणे हे भारतीय तंत्रज्ञांच्या आवाक्यात आहे, याची मला खात्री वाटते. उच्च क्षमतेची सुरक्षा आणि आवश्यक असलेल्या अशाच आव्हानात्मक औद्योगिक प्रक्रिया हाताळण्यात ते पारंगत आहेत, यात यत्किंचितही शंका नाही. अणुऊर्जा क्षेत्रातील सुरक्षितता संस्कृती म्हणजे प्रकल्पाच्या परिसरातील सर्व लोक आणि पर्यावरण यांना आयनीकरण किरणोत्सर्गापासून अधिक संरक्षण मिळणे. या पैलूचा अंतर्भाव रचनेपासून बांधकाम, संचालन, कार्यान्वयन, देखभाल आणि सेवा समाप्तीपर्यंत सर्व टप्प्यांत काळजीपूर्वक करण्यात आला आहे. अणुऊर्जा प्रकल्पातील उपकरणे आणि प्रणाली यांची उच्च विश्वासार्हता सुनिश्चित करण्याची आवश्यकता दोन मुख्य पैलूंवर लक्ष केंद्रित करते. एक म्हणजे, एखादे विशिष्ट उपकरण त्या संयंत्रांच्या कार्यकाळात सोयीस्कर देखभाल किंवा दुरुस्तीसाठी सहज उपलब्ध नसणे आणि दुसरे असे, की ज्या वेळी हा प्रकल्प वीजनिर्मिती करत नसतो तेव्हाही तो ऑपरेटरसाठी कधीही बंद केला जात नाही, हे जाणून घेणे महत्त्वाचे आहे. ज्या इंधनामध्ये उच्च पातळीच्या किरणोत्सगार्ची क्षमता असते, त्याच्या सुरक्षिततेसाठी, ते सुरक्षितपणे अबाधित ठेवण्याकरिता, अगदी अणुभट्टीतून बाहेर काढल्यानंतरही, नेहमी विश्वासार्ह आणि अनेक प्रकारच्या शीतलक साधनांची आवश्यकता असते. अणुऊर्जा तंत्रज्ञानातील या अद्वितीय मापदंडाला अगदी सर्वोच्च पातळीवरील अधिकाऱ्यांपासून ते शेवटच्या कर्मचाऱ्यांपर्यंत सर्वांनी उच्च दर्जाचे प्राधान्य देणे अत्यंत आवश्यक असते. अणुऊर्जा क्षेत्रात अनेक जण पाऊल टाकत आहेत. नव्याने या क्षेत्रात येणाऱ्या या मंडळींसाठी प्रचलित सिद्ध झालेले तंत्रज्ञान अंगीकारणे आणि प्रशिक्षित रचना आणि कार्यान्वयन टीम बाळगणे श्रेयस्कर ठरेल. या नव्या सहभागींसाठी अणुऊर्जा विभागातील अनुभवी घटकांचे मार्गदर्शन सहज उपलब्ध होईल, ज्यामुळे त्यांना या तंत्रज्ञानासाठी आवश्यक असलेली क्षमता आणि कौशल्ये विकसित करता येतील, अशी अपेक्षा आहे. निर्धारित कालमयार्देत १०० गिगावॉट वीज निर्मिती क्षमता गाठण्यासाठी अणुऊर्जा विभागाने या राष्ट्रीय सामथ्यार्ला द्विगुणित करण्याच्या प्रक्रियेला अधिक गती देणे आवश्यक आहे.

वाढत्या शहरांना हवे आहे हिरवे छत्र



दुसरी आंतरराष्ट्रीय आर्बोरिकल्चर परिषद २०२६ पूर्व-परिषद कार्यशाळा ६ मार्च २०२६ रोजी, तर मुख्य परिषद ७-८ मार्च २०२६ या कालावधीत मुंबईत विलेपार्ले पूर्व येथील सहारा स्टार हॉटेलमध्ये होत आहे. त्यानिमित्ताने शहरातील हिरवाईच्या अभावाचा लेखाजोखा. प्रत्येक पावसाळ्यात मुंबईत आपण तेच दुःखद दृश्य पाहतो. एखादे झाड गाडीवर कोसळते. मेट्रोचा खांब उभारण्यासाठी शेकडो वर्षे जगलेला वटवृक्ष एका रात्रीत तोडला जातो. पूर्वी सावली देणारा पदपथ आता उघड्या काँक्रीटची पट्टी बनतो. आपण क्षणभर हळहळतो आणि पुढे निघतो. उंच इमारती, रुंद रस्ते वेगाने बांधण्याच्या आपल्या कामात खंड पडत नाही. आपण तीच चूक वारंवार करत राहतो. झाडांकडे सजावट, अडथळा म्हणून पाहतो. ती शहरी पायाभूत सुविधा आहे हेच विसरतो.

भारत अभूतपूर्व वेगाने शहरीकरणाकडे वाटचाल करतो आहे. २०४७ पर्यंत आपल्या अध्यार्हून अधिक लोकसंख्येचे वास्तव्य शहरांमध्ये असेल. मुंबई, पुणे, बंगळुरू, हैदराबाद, दिल्ली ही शहरे केवळ वाढत नाहीत, तर त्यांचा झपाट्याने कायापालट होत आहे. रस्ते रुंद होत आहेत, उड्डाणपूल उभे राहत आहेत, मेट्रोच्या बोगद्यांसाठी जमिनीखाली खोदकाम सुरू आहे. या प्रत्येक कामाकरिता आपण एक मोठी किंमत मोजत असतो. ती प्रकल्पाच्या अंदाजपत्रकात कधीच दिसत नाही. वृक्ष संवर्धनाचा आग्रह धरणाऱ्यांचे म्हणणे भारतातील नियोजक, अभियंते, महापालिका अधिकारी आणि धोरणकर्त्यांनी स्पष्टपणे ऐकण्याची वेळ कधीच उलटून गेली आहे. झाडे विकासाच्या विरोधात नाहीत. झाडांचे योग्य व्यवस्थापन केल्यास ती विकासाभिमुख आहेत. आर्बोरिकल्चर म्हणजे नक्की काय आणि काय नाही? मी आर्बोरिस्ट आहे असे सांगितले की, अनेकदा समोरचा प्रतिसादादाखल विनम्रपणे मान डोलवतो आणि मी एखाद्या रोपवाटिकेत काम करतो असा समज करून घेतो. विकेंडला कुंपण छाटतो, असा समज करून घेतो. प्रत्यक्षात हे काम त्यापेक्षा कितीतरी अधिक तांत्रिक आणि कितीतरी अधिक महत्त्वाचे आहे.

आर्बोरिकल्चर म्हणजे शहरी वातावरणातील वैयक्तिक झाडांचे व्यवस्थापन करण्याचे शास्त्र आणि कला. यात संरचनात्मक धोक्याचे मूल्यांकन, पायाभूत सुविधा प्रकल्पांसाठी वृक्ष-प्रभाव मूल्यांकन, मुळांच्या क्षेत्राचे व्यवस्थापन, बांधकामाच्या काळात झाडाचे छत्र जपणे, झाडांच्या आरोग्याचे निदान आणि झाड तोडणे व टिकवून ठेवणे याच्याशी संबंधित कायदेशीर व पर्यावरणीय चौकट यांचा समावेश होतो.

एक प्रौढ झाड कार्बन शोषून घेते. बाष्पोत्सर्जनाने सभोवतालचे तापमान दोन ते चार अंशांनी कमी करते. पावसाचे पाणी जमिनीत मुरवते. हवेची गुणवत्ता सुधारते, ध्वनिप्रदूषण कमी करते, जैवविविधता टिकवते आणि मानसिक स्वास्थ्य, मालमत्तेचे मूल्य आणि सामुदायिक एकात्मता यांवर सकारात्मक परिणाम घडवते. झाडे विकासाच्या विरोधात नाहीत, योग्य व्यवस्थापन गरजेचे

मुंबई आर्बोरिकल्चरची आव्हाने सर्वात तीव्र स्वरूपात मांडते. हे शहर असाधारण नैसर्गिक वारसा असलेले आहे. जुने वटवृक्ष जे संपूर्ण चौकांवर छत्र धरतात, किनारपट्टीचे रक्षण करणारी खारफुटीची जंगले, पिढ्यानपिढ्या शहराचे प्रदूषण आणि वेदना शांतपणे सहन करणारी झाडे आणि त्याचवेळी अखंड पायाभूत सुविधांच्या दबावाखाली असलेले हे शहर आहे. गेल्या दशकात एकट्या मुंबईत मेट्रो, किनारी रस्ता आणि महामार्ग प्रकल्पांसाठी हजारो झाडे तोडण्यात आली किंवा कायमची बाधित झाली. यातील काही तोडणे अपरिहार्य होते. पण अनेक झाडे वाचवता आली असती. झाड वाचवणे आणि झाड तोडणे हा बऱ्याचदा नियोजनाच्या टप्प्यातील निर्णय असतो. प्रशिक्षित आर्बोरिस्ट त्या निर्णय प्रक्रियेच्या बैठकीत होता का? मुंबईच्या गर्दीच्या रस्त्यांवर मुळांवर दबाव, चुकीच्या पद्धतीने छाटणी आणि बांधकामामुळे झालेले नुकसान यामुळे झाडे धोकादायक बनतात. कमकुवत झालेले झाड डोळ्यांना वर्षानुवर्षे हिरवेगार आणि निरोगी दिसू शकते. पण एक दिवस अचानक कोसळते. प्रमाणित आर्बोरिस्टकडून झाडाचे जोखीम मूल्यांकन करून घेणे हे खर्चिक नाही. ती सार्वजनिक सुरक्षा आहे.

शास्त्र प्रत्यक्षात कसे दिसते

२०२१ मध्ये माझी संस्था ट्रीकोटेक एलएलपी आणि यूकेमधील बॅरेल ट्री कन्सल्टन्सीचे जेरेमी बॅरेल यांच्यासह चेन्नई येथील एका शाळेच्या बांधकाम स्थळावर १०० वर्षे जुना वटवृक्ष जतन करण्याचे काम मला मिळाले. हा वटवृक्ष बांधकाम क्षेत्राच्या थेट आतमध्ये होता. विकासकाची पहिली प्रतिक्रिया होती की, झाड तोडा. त्याऐवजी आम्ही सविस्तर वृक्ष मूल्यांकन केले. मुळांचे आराखडे नोंदवले, संरचनात्मक स्थिती तपासली, बांधकामाचे परिणाम मांडले. तो वटवृक्ष आजही उभा आहे, जिवंत आहे, त्या शाळेच्या अंगणात. त्याखाली शिकणाऱ्या मुलांना माहीतही नाही की, तो जवळजवळ संपण्याच्या उंबरठ्यावर होता. माज्यासाठी यशस्वी आर्बोरिकल्चर असेच आहे.

दुसऱ्या टोकाला, ट्रीकोटेकने मुंबईजवळ डेटा सेंटर उभारू पाहणाऱ्या एका मोठ्या बहुराष्ट्रीय कंपनीसाठी ९०० हून अधिक झाडांचे वृक्ष-प्रभाव मूल्यांकन अलीकडेच पूर्ण केले. सविस्तर स्थिती सर्वेक्षण, सरकारी परवानग्यांसाठी कायदेशीर मदत हे या कामाचे स्वरूप होते.

व्यावसायिक आर्बोरिकल्चर महागडा अव्यापारेषु व्यापार नाही. एक झाड कोसळण्याच्या घटनेतून होणारी जीवितहानी, मालमत्तेचे नुकसान, दिवाणी खटले आणि कोट्यवधींचे नुकसान होऊ शकते.

जोखीम कमी करण्यापलीकडे, रस्त्यावरील झाडे व्यावसायिक मालमत्तेचे मूल्य पाच ते पंधरा टक्क्यांनी वाढवतात. हरित मार्गिका शहरातील उष्मा कमी करतात. इमारतींचा थंडाव्यासाठी लागणारा ऊर्जाखर्च घटतो.

जागतिक संवाद, मुंबईत रुजलेला

भारताला हे शास्त्र नव्याने शोधण्याची गरज नाही. यूके, ऑस्ट्रेलिया, सिंगापूर, अमेरिका आणि युरोपमध्ये प्रगत आर्बोरिकल्चर अस्तित्वात आहे. आपण त्यांच्या अनुभवातून शिकू शकतो, त्यांच्या पद्धती अंमलात आणू शकतो.

अमेनिटी ट्री केअर असोसिएशन नानाजी देशमुख प्रतिष्ठानच्या सहकार्याने मुंबईत दुसरी तीन दिवसीय आंतरराष्ट्रीय आर्बोरिकल्चर परिषद २०२६ आयोजित करत आहे. ६ मार्च २०२६ रोजी पूर्व-परिषद कार्यशाळा आयोजित केली आहे. यामध्ये बांधकामात झाडे कशी टिकवायची यावरील कार्यशाळा होणार आहे. व्हर्ग कॉलेज ऑफ आर्किटेक्चर, वांद्रे पश्चिम, मुंबई येथे होणाऱ्या या कार्यशाळेत जेरेमी बॅरेल, व्यवस्थापकीय संचालक, बॅरेल ट्री कन्सल्टन्सी, यूके हे प्रमुख मार्गदर्शक आहेत. आपल्या आजूबाजूची झाडे ही दुसरी कार्यशाळा महाराष्ट्र निसर्ग उद्यान, धारावी, मुंबई येथे होणार असून त्यामध्ये मार्गदर्शक डॉ. प्राची गुप्ता, अझीम प्रेमजी विद्यापीठ, बंगळुरू या आहेत.

दि. ७-८ मार्च २०२६ दरम्यान मुख्य आंतरराष्ट्रीय परिषद सहारा स्टार हॉटेल, विलेपार्ले (पूर्व), मुंबई येथे होत असून परिषदेचे प्रमुख पाहुणे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे ''वाढती शहरे, हिरवे छत्र.'' यावर मार्गदर्शन करतील.

मुख्य परिषदेच्या दोन दिवसांत मुंबई ग्रीनवेचे सहसंस्थापक वास्तुविशारद अलन अब्राहम आणि अभिनेत्री व संयुक्त राष्ट्र पर्यावरण सदिच्छादूत दिया मिर्झा यांची मुख्य भाषणे होतील. अमेरिकेतील आर्बर डे फाऊंडेशनचे उएड डॅन लॅम्बे, आर्बोरिकल्चर ऑस्ट्रेलियाचे कार्ल डाला रिवा, टेनेसी विद्यापीठाच्या डॉ. शेरॉन जीन-फिलिपे, ग्रीहिलचे उएड गॅबोर गोट्झ्ल आणि डॉ. संग्राम चव्हाण, डॉ. स्मिता हेगडे, डॉ. विजय मोरस आणि आर्किटेक्ट शिल्पा गवाणे यांसारखे देशी, विदेशी तज्ञ मार्गदर्शन करतील.

दहशतीचा 'नापाक' संकर



दिल्लीमध्ये उघडकीस आलेला दहशतवादी हल्ल्याचा कट म्हणजे पाकिस्तानपुरस्कृत दहशतवादाचे शेपूट अजूनही वळवळतेच असल्याचे निदर्शक आहे. दिल्लीतील भीषण स्फोटात १३ नागरिकांचे बळी जाण्याच्या घटनेस तीन महिने होत आहेत; त्याच वेळी फरिदाबाद आणि जम्मू-काश्मीरमध्ये दहशतवाद्यांचे मोड्यूल उघडकीस आले आणि मोठ्या प्रमाणात स्फोटकांचा साठाही जप्त करण्यात आला. त्या पार्श्वभूमीवर नवा कट तपास यंत्रणांनी उधळून लावला. यात अटक केलेले बांगलादेशी नागरिक असल्याने पाकिस्तानी 'आयएसआय' आणि बांगलादेशातील भारतविरोधी प्रवृत्तींचा संकर ही भारताची नवी डोकेदुखी ठरू शकते. त्या पार्श्वभूमीवर भारतात धार्मिक स्थळांच्या परिसरात घातपाती कारवाया करण्याचा पाकिस्तान्यांचा कावा दिसतो. या प्रकरणात तमिळनाडूमधून काही संशयितांना ताब्यात घेण्यात आले; तसेच पश्चिम बंगालमध्येसुद्धा याचे धागेदोरे आढळले आहेत. गेल्या वर्षी पहलगाम हल्ल्यानंतर भारताने 'ऑपरेशन सिंदूर' राबवले आणि 'लष्कर ए तय्यबा' व 'जैश ए महंमद' या दहशतवादी संघटनांचे तळ उद्ध्वस्त करून पाकिस्तानला धडा शिकवला. त्यानंतर बांगलादेशातील अस्वस्थतेचा फायदा घेऊन तेथेही भारतविरोधी भावना भडकावण्याचे पाकिस्तानचे उद्योग सुरू आहेत. आता बांगलादेशात सत्तारूढ झालेल्या नव्या सरकारने पूर्वीप्रमाणे नसले, तरी भाराताशी चांगले संबंध ठेवण्याचे सूतोवाच केले आहे. मात्र, पाकिस्तान त्यात आडकाठी आणण्याचा प्रयत्न करणार आणि अशा पद्धतीच्या घातपाती कारवायांना फूस देणार, असेच दिसते. एकीकडे पाकिस्तान स्वतः दहशतवादी कारवायांना तोंड देत आहे.

मल्ल्याच्या प्रत्यार्पणाचा तिढा

भारतातील बँकांतील आर्थिक अनियमिततेमुळे देश सोडून गेलेला उद्योगपती विजय मल्ल्या पुन्हा चर्चेच्या केंद्रस्थानी आला आहे. भारतात परतण्याविषयी मुंबई उच्च न्यायालयाने विचारणा केली असता, त्याने तेथील न्यायालयीन प्रक्रियेमुळे त्यास प्रतिबंध आहे, असे उत्तर दिले. एखादी व्यक्ती न्यायालयाच्या अधिकारक्षेत्रात येत नसेल, तर तिला न्यायालयीन सवलती किंवा घटनात्मक संरक्षण मागण्याचा पूर्ण अधिकार मिळत नाही, असे भारतीय न्यायप्रक्रिया सांगते, तर एखादी व्यक्ती न्यायालयीन नियंत्रणाखाली असल्यास ती स्वतःच्या इच्छेने देश सोडू शकत नाही, असे ब्रिटिश न्यायप्रक्रिया सांगते. भारतीय दृष्टिकोनातून मल्ल्या फरारी आहे, तर ब्रिटिश दृष्टिकोनातून तो न्यायालयीन निबंर्धाखाली आहे. यामध्ये भारत आणि ब्रिटनमध्ये असलेल्या प्रत्यार्पण कराराचाही विचार व्हायला हवा. या करारानुसार मल्ल्या भारतात यायला हवा; परंतु त्याचे प्रत्यार्पण न्यायालयीन प्रक्रियेत अडकले आहे. भारताचे पुरावे तेथील न्यायालयानुसार पुरेसे असले, तरी मल्ल्याने तुरुंगांची दुरवस्था, आरोग्याच्या समस्या, राजकीय सूड, न्याय्य सुनावणीविषयी शंका येथपासून मानवाधिकारापर्यंतचे मुद्दे तेथील न्यायालयात नेऊन, शक्य तेवढे कालहरण करण्याचा प्रयत्न केला आहे. सध्या एका 'गोपनीय कायदेशीर बाबी'मुळे त्याचे प्रत्यार्पण प्रलंबित आहे. एका देशात गुन्हा करून दुसऱ्या देशात पळून गेलेल्या आरोपींवरील पुढील कारवाईचा रस्ता किती काट्याकुट्यांचा आहे हे यावरून लक्षात यावे. गुन्हा एका देशात आणि न्यायप्रक्रिया दुसऱ्या देशात असेल, तर 'अंतिम न्यायाधिकार' कोणाचा, हा महत्त्वाचा प्रश्न आहे.

पोलीस बातमी पत्र

संमिश्र

४

मुंबई, मंगळवार, १७ मार्च २०२६ ते २३ मार्च २०२६

घरात घुसून १४ वर्षांच्या मुलीवर बलात्कार, घाबरुन गप्प बसली

मुंबई। एका ३० वर्षीय व्यक्तीने १४ वर्षांच्या अल्पवयीन मुलीवर बलात्कार केल्याची संतापजनक घटना समोर आली आहे. या नराधमाच्या कृत्यामुळे पीडित मुलगी गरोदर राहिली आणि सोमवारी (२३ फेब्रुवारी) तिने एका गोंडस मुलीला जन्म दिला. आरोपीने तिच्यावर फक्त अत्याचारच केले नाहीत; तर पीडितेचे अश्लील फोटो आणि व्हिडिओही बनवले. पीडितेच्या वडिलांच्या तक्रारीवरून आरोपीला बेड्या ठोकल्या आहेत. उत्तर प्रदेशातील मुरादाबाद परिसरातील ही घटना आहे.

गोंडस मुलीला दिला जन्म

काही दिवसांपूर्वी पीडितेच्या पोटात दुखू लागल्याने कुटुंबीयांनी तिला उपचारासाठी दवाखान्यात नेले. तिथे अल्ट्रासाऊंड केल्यानंतर ती गरोदर असल्याचे समोर आले, ज्यामुळे पालकांना मोठा धक्का बसला. वारंवार विचारणा करूनही भीतीने तिने काहीच सांगितले नाही. सोमवारी तिला प्रसुती वेदना सुरू झाल्याने खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले, जिथे तिने एका मुलीला जन्म दिला. त्यानंतर या संपूर्ण प्रकरणाचा उलगडा झाला आणि वडिलांनी पोलीस ठाणे गाठले. पीडितेला शासकीय मदत पोलिसांनी याप्रकरणी तातडीने पावले उचलत आरोपी सरताजला अटक केली आहे. पोलिसांनी सांगितले की, आरोपीला न्यायालयात हजर केले असता त्याची रवानगी तुरुंगात करण्यात आली आहे. तसेच, पीडितेला शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करून संबंधित विभागाकडे पाठवण्यात येत आहे. पीडित मुलीला न्याय मिळवून देण्यासाठी पोलीस सर्वतोपरी प्रयत्न करत आहेत.



व्हिडिओ व्हायरल करण्याची धमकी देत अत्याचार

हा प्रकार सुमारे एक वर्षापूर्वी सुरू झाला. पीडितेचे कुटुंबीय घराबाहेर गेले असताना आरोपी सरताज याने घरात घुसून मुलीवर जबरदस्ती केली. केवळ अत्याचारच नाही, तर नराधमाने या कृत्याचे अश्लील फोटो आणि व्हिडिओही बनवले. हे व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल करण्याची धमकी देऊन तो गेल्या वर्षभरापासून पीडितेवर दबाव टाकत राहिला. यामुळे घाबरलेल्या मुलीने हा प्रकार कोणालाही सांगितला नाही.

नागपूरात महिलेला बघून तरुणामध्ये जागा झाला सैतान...

चाकूचा धाक दाखवून शरीरसुखाची केली मागणी

मुंबई। नागपूरच्या शांतीनगर पोलीस ठाणे हद्दीत एका कुख्यात गुन्हेगाराने एका महिलेच्या घरात घुसून चाकूचा धाक धाकवला. नंतर त्या महिलेकडे शरीरसुखाची मागणी केली. तिने नकार देताच त्याने पीडितेकडे ५० हजार रुपयांची खंडणी मागितली. या घटनेनं परिसर हादरून गेला आहे. या प्रकरणी आरोपीवर गुन्हा दाखल करण्यात आला असून ही घटना २० फेब्रुवारी रोजी घडल्याचे वृत्त आहे. या घटनेनं महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.



आरोपीनं महिलेकडे केली शरीरसुखाची मागणी

नागपूर शहरातील शांतीनगर पोलीस ठाणे परिसरातच ही घटना घडली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी सुरेंद्र उर्फ मनोज समुंद्रे (वय २७) ही व्यक्ती २० फेब्रुवारी रोजी पीडितेकडे शरीरसुखाची मागणी करत होती. महिलेनं विरोध केल्याने आरोपी संतापला. त्याने पीडितेकडे ५० हजार रुपयांची मागणी केली होती.

नंतर चाकूने मारण्याची दिली धमकी

पीडितेनं नकार देताच मुलाला चाकूने मारण्याची धमकी देखील दिली. महिलेनं आरडाओरड केली असता, आरोपी घटनास्थळावरून पळून गेला. या घडलेल्या घटनेनंतर पीडितेनं शांतिनगर ठाण्यात तक्रार दाखल केली. यानंतर पोलिसांनी कारवाई करत आरोपीला ताब्यात घेतले.

सांगण्यात येतंय की, आरोपी हा आठ वर्षांची शिक्षा भोगून तुरुंगातून बाहेर आला होता. काही शहरांमध्ये आरोपीविरोधात अनेक गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. पोलीस सध्या आरोपीची चौकशी करत आहेत आणि पुढील कायदेशीर कारवाई सुरू आहे.

लग्नाला गेलेल्या तरुणीवर लैंगिक अत्याचार, स्कार्फसह मृतदेह...'

मुंबई। एक विद्यार्थीनी लग्नापूर्वी सुरु असलेल्या नातेवाईकांच्या कार्यक्रमात गेली होती. त्याच समारंभात ती पाण्याच्या पंपावर हात धुण्यासाठी गेली असता, पुन्हा परतलीच नाही. बराच वेळ कुटुंबियांनी शोध घेतला, त्यानंतर कुटुंबातील सदस्य बागेत पोहोचले. पण त्यांना मुलीचा मृतदेह स्कार्फने लटकलेल्या स्वरुपात झाडाला आढळून आलेला दिसला, या घटनेचा थरार संबंधित कुटुंबातील सदस्यांनी सांगितला. ही घटना बिहारच्या सुपौल जिल्ह्यातील असल्याचे वृत्त आहे.

'मुलीवर सामूहिक अत्याचार', कुटुंबियांनी सांगितला घटनेचा थरार घडलेल्या घटनेनुसार कुटुंबियांनी सांगितलं की, त्यांच्या मुलीवर सामूहिक अत्याचार करण्यात आला आणि नंतर तिची निर्घृणपणे हत्या करण्यात आली होती. संबंधित मृत तरुणी ही बीए चे शिक्षण घेत होती. ती मूळची जिल्ह्यातील किशनपूर पोलीस ठाणे परिसरातील एका गावातील रहिवासी होती. ती लहानपणापासून तिच्या आजोबांच्या घरी शिक्षण घेत होती. पोलिसांना या घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवला. सोमवारी स्थानिक पोलिसांसह जिल्हा फॉरेन्सिक टीम, सायबर पोलीस ठाणे पथक आणि डीआययू पथकाने घटनास्थळी धाव घेत पुरावे गोळा केले. घटनास्थळावरून मुलीच्या चप्पलाही जप्त केल्या आहेत. घटनेबाबत अधिकाऱ्यांनी सांगितलं की, मुलीच्या मृतदेहाची चौकशी सुरु आहे. एफएसएल आणि तांत्रिक पथकही तपासात सहभागी आहे. अर्ज मिळाल्यानंतर पुढील कारवाई केली जाईल. बलात्काराबाबत शवविच्छेदनाचा रिपोर्ट आल्यानंतर खरं खोटं हे स्पष्ट होईल.

वसई विरार शहर महानगरपालिका

जा.क्र : ववि‌शम/प्रससी/जाहि/ ६३/२०२६ दिनांक ११/०३/२०२६

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४१ चे अधिसुचीतील प्रकरण ८ (कराधान नियम) मधील कलम १(१) व १(२) अन्वये व ४६९ च्या नुसार जाहिर नोटीस खालील मालमत्तेच्या हस्तांतरणा संबधित वसई-विरार शहर महानगरपालिका विभागीय कार्यालय विरार येथे प्राप्त मालमत्ता प्रकरणपरत्वे नोटीसीनुसार सदर हस्तांतरण संदर्भाने हरकत अगर आक्षेप असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत हितसंबधाच्या हरकतीच्या लेखी पुराव्यासह वसई विरार शहर महानगरपालिका विभागीय कार्यालयात लेखी स्वरुपात हरकत नोंदवावी. करवसुलीच्या सोयीसाठी हस्तांतरण करुन महानगरपालिका पुराव्यासह नोंद घेतली जाईल.

अ.क्र	दिनांक	अनुसुचित दोन/तीन मधील नोटीसीचा मालमत्ता क्र.	करनिर्धार पुस्तकातील वॉर्ड क्र.	मालमत्तेचे ठिकाण	मालमत्तेचे स्वरुप	ज्यांचे नावे मालमत्ता आहे त्यांचे म्हणजे मालमत्ता विकणा-याचे नाव किंवा अभिहस्तांकन कर्त्याचे नाव	खरेदीखताचे किंवा अभिहस्तांकन कर्त्याचे नाव
१	०२-०२-२६	VR०१/६२५/१८	०१	मयुर अपार्ट, रुम नं ३०१ केशव नगर	निवासी	गणेश सखाराम शेलार	रविकांत श्रीकांत कनोजिया
२	०२-०२-२६	VR०१/६१२/११२	०१	जी एम नगर, बिल्डींग नं इ	निवासी	उल्हास बांदेकर	शशांक अनिल तिवारी व महिमा अनिल तिवारी
३	०२-०२-२६	VR०१/७८२/३९	०१	पांडुरंग म्हात्रे अपार्टमेंट. बी विंग, रुम नं ३०५	निवासी	सुनिल कृष्णदेव झा	विष्णू बाबू जाधव
४	०२-०२-२६	VR०१/५२९/२१	०१	सिध्देश्वर अपार्ट रुम नं. १०८	निवासी	गौरी कृष्णा पुजारी	शिल्पा निमेश निकम
५	०२-०२-२६	VR०१/५२९/१६	०१	सिध्देश्वर अपार्ट रुम नं. १०३	निवासी	वासंती वसंत सावंत	राजेश वसंत सावंत
६	०२-०२-२६	VR०२/९३१/१६	०२	ओम साई अपार्ट चंदनसार रोड साईनाथ नगर	निवासी	गोकुलदास धोंडु तळाशिलकर	माधुरी महेश अमरे
७	०२-०२-२६	VR०१/८१७/३४	०१	ध्रुवी अपार्टमेंट, नारंगी रोड	निवासी	गोपाळ सुरेश नारकर	रचना रमेश गवाणे
८	०२-०२-२६	VR०१/५०६/७२	०१	मकवाना कॉम्पलेक्स, सी विंग, विरार पूर्व	निवासी	विद्यासागर प्लामो टील	मारीयाम मुजाईफ शेख व मुजाईफ हुसैन शेख
९	०२-०२-२६	VR०५/९२३/१०९	०५	गोकुळधाम नं-२, रुम नं बी-२०५	निवासी	दत्ताराम के. गावडे	कृष्णा दत्ताराम गावडे
१०	०२-०२-२६	VR०५/१७६४/२	०५	श्री गणेश अपार्टमेंट, सी विंग	निवासी	श्रवण हरीशंकर झा	निक्की पवन झा
११	०२-०२-२६	VR०५/१२०६/६	०५	अनुसया वावरे चाळ फुलपाडा	निवासी	बाळकृष्ण शंकरराव	सियादेवी दिनेशकुमार गुप्ता
१२	०३-०२-२६	VR३२/८१/१	३२	चित्सीया अपार्ट गाळा, नं ६	निवासी	नयन गोविंद धामणे	मंदार दिनेश धामणे व दिनेश गोविंद धामणे
१३	०३-०२-२६	VR०५/८२/१/२	०५	सिध्दी बिल्डींग फुलपाडा डॅम जवळ	निवासी	बाबु युधिष्टीर दास	अंकीता अनंत नाईक
१४	०३-०२-२६	VR०५/५८८/३०	०१	सुमा अपार्ट, रुम नं ३०५	निवासी	निजामुद्दीन सिराजुद्दीन शेख	अफरोज बानो खलिद अली चौहान
१५	०३-०२-२६	VR०२/९१५/७९	०२	वैष्णवी अपार्टमेंट, ए/५०९	निवासी	गंगाराम रामचंद्र अंबावले	सागर सहदेव घाग
१६	०३-०२-२६	VR०१/५८८/१०	०१	सुमा अपार्ट, रुम नं. १०१	निवासी	अकिला अब्दुल रशीद शेख	नाझीम निजामुद्दीन शेख
१७	०३-०२-२६	VR०१/७००/३०	०१	आर जे अपार्टमेंट बि. नं. ६	निवासी	पुंडलिक शंकर पाटील	प्रमोद पुंडलिक पाटील
१८	०३-०२-२६	VR०१/७३८/१९	०१	ओम नित्यानंद अपार्ट पाचपायरी	निवासी	संदेश मनोहर पांचाळ	मिलींद उध्दव गावडे
१९	०३-०२-२६	VR०१/६०९/६	०१	अशोका अपार्टमेंट, बी-२	निवासी	शिल्पा चंद्रकांत जांभुळकर	यशवंत तुळशिराम नकते
२०	०३-०२-२६	VR०१/८३९/५	०१	जय जिवदानी अपार्टमेंट, रुम नं ए/२०२	निवासी	दिनेश पार्थ सिखा	प्रशिक संतोष मोरे

सही /-
सहा. आयुक्त
प्रभाग समिती 'सी' चंदनसार
वसई विरार शहर महानगरपालिका

हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक झ श्री. डॉ. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय झ गाळा नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र), वेथे छापून २, राजाराम सी.एच.एस. लिमिटेड, बंदरवाडी, नवघर रोड, भाईंदर (पुर्व), जिल्हा ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिध्द केले. संपादक झ श्री. डॉ. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमान पत्रात प्रसिध्द होणाऱ्या बातम्या/लेख/जाहिराती यांची जवाबदारी संबंधीत वार्ताहर, लेखक आणि जाहिरात प्रतिनिधी यांच्यावर राहील.) भ्रमणध्वनी ८४२४९८९८९८. Email ID: policebatmipatra@gmail.com

Printed, Published and owned by Mr.Dr. Deepak MoreshwarNaik Printed at SOMANI PRINTING PRESS, OFFICE UNIT NO. 4, N.K.INDUSTRIAL ESTATE, NEAR PRAVASI INDUSTRIAL ESTATE, GATE NO. 2, GOREGAON (E), MUMBAI 400063, MAHARASHTRA, Published At 2, RajaramChs. Ltd., Bunderwadi, Navghar Road, Bhayander(E), Dist - Thane, Pincode 401105, Maharashtra. Editor Mr. Dr. Deepak Moreshwar Naik. Mo.8424989898, Email ID: policebatmipatra@gmail.com